# पदभरती जाहिरात

## जिल्हा सामान्य रुग्णालय नांदेड

**कंत्राटी पद्धतीने खालील नमूद पदांकरिता** ***अर्ज मागविण्यात येत आहेत.***

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन

कोविड-१९ अंतर्गत खालील पदाची नांदेड महानगर पालिका व जिल्हा कार्यक्षेत्र CCC, DCHC व DCH येथे कोरोना (कोविड -१९) साठीचा संसर्गजन्य आजार नियंत्रणात येईपर्यंत, बाँड पूर्ण न झालेले व इतर परंतु आरोग्य सेवा देण्यास सक्षम असणाऱ्या उमेदवारांची कंत्राटी पदे आवश्यकतेनुसार भरावयाची आहेत. त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी **http://nanded.nic.in** या संकेत स्थळावर सदर जाहिरात पाहून त्याप्रमाणे त्यामध्ये देण्यात आलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्ये आणि सर्व आवश्यक शैक्षणिक अर्हता, जन्मतारीख दाखला, तसेच संबंधित परिषदेची अद्यावत नोंदणी असल्याचे प्रमाणपत्रासह दररोज दु.१२.०० पर्यंत जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाच्या आवक जावक शाखेकडे सादर करावेत.

| पदनाम | शैक्षणिक अर्हता | कमाल वयोमर्यादा | वेतन दरमहा |
|---|---|---|---|
| Medical Officer | M.B.B.S./ BAMS/BUMS/BDS | **MBBS अर्हताधारकाकरिता ७० वर्ष व इतर अर्हताधारकाकरिता खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व राखीव प्रवर्गासाठी-४३ वर्ष** | MBBS अर्हता धारकांकरिता ६००००/- तर इतर अर्हता धारकांकरिता ३००००/- |
| Ayush Medical Officer | BAMS/ BUMS | **खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व राखीव प्रवर्गासाठी-४३ वर्ष** | **३००००/-** |
| Hospital Manager | Any Medical Graduate with PHM or MBA in Hospital Administration & one year experience of Hospital Administration | | **३५०००/-** |
| Staff Nurse | B.Sc. nursing/ GNM /ANM | | **२००००/-** |
| X-Ray Technician | Retd. X- Ray technician from Govt Hospital | | **१७०००/-** |
| ECG technician | Experience of ECG Technician at least one year. | | **१७०००/-** |

**<u>अटी व शर्ती –</u>**

१) इच्छुक उमेदवारांनी देण्यात आलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्ये अर्ज करून सोबत आवश्यक सर्व कागदपत्रे १) वयाचा दाखला २) पदवी/ पदविका च्या शेवटच्या वर्षाची एकत्रित टक्केवारी दर्शविणारी गुणपत्रिका सादर करावी (सर्व वर्षांच्या गुणपत्रिका जोडण्यात येऊ नयेत) ३) पदवी प्रमाणपत्र ४) संबंधित परिषदेची अद्यावत नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र ५) शासकीय/ निमशासकीय/ राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र एवढीच कागदपत्रे स्पष्टपणे आणि दिसण्यासारख्या स्वरुपात दररोज दु १२.०० वाजेपर्यंत जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या कार्यालयातील आवक जावक विभागाकडे सादर करावेत.

२) सदर नियुक्ती ही कंत्राटी स्वरुपाची असून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आहे व कोरोना साथ संपेपर्यंतच किंवा नियुक्ती प्राधिकारी ठरवतील तो पर्यंत सदर नियुक्त्या अस्तित्वात राहतील.

३) प्राप्त झालेल्या अर्जावरून Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण + उच्च शैक्षणिक गुण +शासकीय व निमशासकीय कार्यालयातील संबंधित पदाच्या अनुभवाच्या गुणावरून मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल आणि पदांच्या आवश्यकतेनुसार संबंधित पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील.

४) उमेदवारांनी काम करण्यास इच्छुक असलेल्या महानगर पालिका क्षेत्र / तालुक्याचे नाव अर्जामध्ये नमूद करणे अनिवार्य असून त्याच तालुक्यातील आवश्यक त्या रिक्त पदानुसार उमेदवारांना त्याच तालुक्यात नियुक्ती देण्यात येईल. इतर तालुक्यामध्ये जाण्याबाबत उमेदवाराने इच्छा दर्शविल्यास त्यास इतर तालुक्यामध्येही पदस्थापना देण्याबाबत विचार करण्यात येईल.

५) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असून COVID-१९ या साथरोगाच्या कालावधी पुरतीच असल्याने, साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील COVID-१९ उपचार केंद्रे बंद झाल्यांस किंवा कृती आराखड्यामध्ये पदांना मंजुरी न मिळाल्यास सदरील नेमणूक कोणतीही पूर्व सूचना न देता आपोआप सेवा समाप्त करण्यात येईल.

६) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा.

७) सदर पदे करार पद्धतीने भरावयाचे असल्याने सदर पदांवर शासकीय सेवेप्रमाणे असलेले कोणतेही नियम, अट व शर्थी याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत तसेच एकत्रित मानधनाशिवाय अन्य कोणताही भत्ता लागू राहणार नाही.

**टिप :- MBBS अर्हताधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास BAMS/BUMS/BDS अर्हताधारक उमेदवारांचा तर B.Sc Nursing/ GNM अर्हताधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास ANM अर्हताधारक उमेदवारांचा विचार करण्यात येईल.**

सदस्य सचिव, निवड समिती<br>तथा जिल्हा शल्य चिकित्सक,<br>नांदेड